नियमित दिवाणी दावा क्र.१००/२०२१
जुही–वि–जिल्हाधिकारी व इतर

**<u>निशाणी क्र.१८ खाली आदेश</u>**

(पारित दि.०७/०३/२०२२)

१ सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ ने नुकसान भरपाई रक्कम रूपये १७,८२,५९८/– पाच वर्ष मुदतीकरिता राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेवी करणेबाबत दिला आहे. त्यावर वादीच्या वकीलांनी योग्य तो आदेश पारित करावा असे म्हणणे सादर केले.

२ प्रतिवादीचे असे कथन आहे की, सदर प्रकरणातील सक्षम प्राधिकारी यांनी निर्णीत केलेली नुकसान भरपाई रक्कम रूपये १७,८२,५९८/– राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ चे कलम ३एच(४) मधील तरतूदीनुसार न्यायालयात जमा केलेली आहे. सदरच्या प्रकरणात वादी व प्रतिवादी क्र.३ यांचेमध्ये वाटपाबाबत वाद असल्याने तो वाद अंतिमरित्या गुणवत्तेवर निकाली निघण्यास अवधी लागणार आहे. अशा परिस्थितीत सदर रकमेवर व्याज नुकसान होवू नये म्हणून ती रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेवीमध्ये ठेवणे न्यायसुसंगत राहील.

३. दाव्याचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा मोबदल्याची रक्कम मिळण्यास ती एकमेव हक्कदार असल्याचे जाहीर करून मिळण्यासाठी व ती रक्कम प्रतिवादी क्र.३ ला प्रतिवादी क्र.१ व २ यांनी देवू नये असा कायम मनाईहुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुतच्या दाव्याला प्रतिवादी क्र.३ ने लेखी जबाब सादर करून प्रतिदावा घोषणा हुकूमनामा मिळण्यासाठी निशाणी क्र.११ प्रमाणे दाखल केला. उभय पक्षांच्या कथनावरून हे स्पष्ट होते की, सक्षम

अधिका—यांनी निर्धारीत केलेली नुकसान भरपाईची रक्कम वादी अथवा प्रतिवादी क्र.३ यापैकी कोण मिळण्यास पात्र आहे याबाबतचा वाद न्यायालयापुढे असल्याने सदरचा वाद गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी निश्चितच काही कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दि.२५/११/२०२१ रोजीचा धनादेश क्र.७२०६२९ अनुसार नुकसान भरपाई रक्कम रूपये १७,८२,५९८/— न्यायालयात जमा केले आहे. सदर रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेत पाच वर्षाच्या मुदतीकरिता मुदत ठेवीमध्ये ठेवणे न्यायोचित ठरेल त्यामुळे जमा रकमेवर व्याज प्राप्त होवून मुदतीअंती व्याजासह ती रक्कम वादी अथवा प्रतिवादी यांना देता येईल.

सबब अर्ज मंजूर करण्यात येते.

अधिक्षक, दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), दारव्हा यांना आदेशीत करण्यात येते की, दि.२५/११/२०२१ रोजीचा धनादेश क्र.७२०६२९ नुसार जमा रक्कम रूपये १७,८२,५९८/— (सतरा लाख ब्यांशी हजार पाचशे अठ्ठयान्नव) राष्ट्रीयकृत बॅकेत पाच वर्षाच्या मुदतीकरिता मुदत ठेवीमध्ये ठेवण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VARSHA RAMBHAU JAMBHULE
Date: 2022.03.08 16:31:38 +0530

(श्रीमती व्ही.आर. जांभुळे)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
दारव्हा.

दि.०७/०३/२०२२